**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री अंबालिका शुगर प्रा. लि., गट नं.३९२ ब, अंबिकानगर, पो. जगदंबा फॅक्टरी, गांव बारडगांव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या साखर कारखान्याचे विस्तारीकरण १२००० टीसीडी (ऊस गाळप क्षमता) ते १७००० टीसीडी (ऊस गाळप क्षमता) आणि मोलॅसिस आधारित आसवणी युनिटचा १५० केएलपीडी वरुन ४०० केएलपीडी पर्यंत (२५० केएलपीडी ने विस्तार) सिरप/"बी" आणि "सी" हेवी मोलॅसिस वापरुन आणि सह वीज निर्मिती ३८ मेगा वॅट ते ६२.५ मेगा वॅट प्रती दिन क्षमतेच्या प्रस्तावित प्रकल्पा संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत –**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री अंबालिका शुगर प्रा. लि., गट नं.३९२ ब, अंबिकानगर, पो. जगदंबा फॅक्टरी, गांव बारडगांव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या साखर कारखाना विस्तारीकरण १२००० टीसीडी (ऊस गाळप क्षमता) ते १७००० टीसीडी (ऊस गाळप क्षमता) आणि मोलॅसिस आधारित आसवणी युनिटचा १५० केएलपीडी वरुन ४०० केएलपीडी पर्यंत (२५० केएलपीडी ने विस्तार) सिरप/"बी" आणि "सी" हेवी मोलॅसिस वापरुन आणि सह वीज निर्मिती ३८ मेगा वॅट ते ६२.५ मेगा वॅट प्रती दिन क्षमतेच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थळ मे. अंबालिका शुगर प्रा. लि., गट नं.३९२ ब, अंबिकानगर, पो. जगदंबा फॅक्टरी, गांव बारडगांव सुद्रिक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

उप प्रादेशिक अधिकारी तथा आयोजक यांनी, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सदस्य पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. श्री. अंबालिका शुगर प्रा. लि., गट नं.३९२ ब, अंबिकानगर, पो. जगदंबा फॅक्टरी, गांव बारडगांव सुद्रिक, ता. कर्जत, जिल्हा-अहिल्यानगर महाराष्ट्र यांच्या विस्तारीकरण करण्याबाबतचा जाहिर लोक सुनावणीचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस

प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदुषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि.२८/१०/२०२५ रोजी आयोजित करण्याबाबत मान्यता देण्यात आली. मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. ई- ७२ दि. १६/१०/२०२५ रोजी खालील प्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, अहिल्यानगर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी — प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक. - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर. - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहिल्यानगर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस

अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १९-०९-२०२५ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्ताऐवज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर.

२) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर.

४) उप विभागीय अधिकारी, कर्जत, जिल्हा अहिल्यानगर.

५) तहसीलदार, तहसील कार्यालय, कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर.

६) पंचायत समिती कार्यालय, कर्जत, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर.

७) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालये - बारडगांव सुद्रीक, बारडगांव दगडी, भांबोरा, ताजू, बेलवंडी, सिध्दटेक, जलालपूर, वायसेवाडी, करमनवाडी, गणेशवाडी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर.

८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, नाशिक.

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल, पहिला मजला, हॉल नं.२ व ३, टी.व्ही. सेंटरजवळ, सावेडी, अहिल्यानगर -४१४ ००३

१२) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आयोजकांनी सांगीतले की, या कार्यालयाकडे ०१ निवेदन ईमेलद्वारे प्राप्त झालेले आहे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले व सदरील सुचनांची, आक्षेपांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येऊन बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डींग पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

आयोजकांनी मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याचे आदेशीत केले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही

पर्यावरणविषयक सूचना किंवा टीकाटिप्पणी उपस्थित करावयाच्या असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात. आपले नांव व गावाचे नांव प्रथम सांगण्यात यावे. आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे-**

**१) श्री विजय रसाळ,राहणार-शेडगाव,, तालुका,-श्रीगोंदा,जिल्हा-अहिल्यानगरः-**

विस्तारिकरणाच्या प्रकल्पास पाठिंबा आहे असे सांगीतले. प्रकल्प विस्तारकरणामुळे शेतकरी, गाव व समाजास फायदाच होणार आहे. परंतु ऊसाच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब होतात व खराब रस्ते दुरुस्त करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

त्यावर प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की ऊसाच्या वाहतुकीमुळे होणारे खराब रस्ते वेळोवेळी दुरुस्तीबाबतचा पाठपुरावा करण्यात येईल.

**२) श्री सागर लोंढे, राहणार-भांबोरा, तालुका-कर्जत, जिल्हा-अहिल्यानगरः-**

प्रस्तावित विस्तारिकरणामुळे परिसरात हवा व जल प्रदूषण होणार आहे काय व त्यावर काय उपाययोजना योजिलेल्या आहेत?

प्रकल्प प्रवर्तकांनी विस्तारिकरणा दरम्यान अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व जल प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात येणार आहेत असे सांगीतले.

**३) डॉ. नितीन पिसाळ, राहणार-बारडगाव सुद्रीक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहिल्यानगरः-**

यांनी प्रथमतः विस्तारिकरणाचे स्वागत केलेले आहे. तसेच सद्यस्थितीत कारखान्याच्या पंचक्रोशीतील जीवनमान उंचावल्याचे सांगितले. तसेच कारखान्यामुळे गायरान टेकडीजवळ पाणी उपलब्ध केल्याने शेती व परिसरातील जीवनमान सुधारल्याचे सांगितले. कारखान्यामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त झालेली असून परिसरातील मुलांना शिक्षणाची सोय झालेली आहे. तसेच कारखान्याने केलेले वनीकरण व शेती विषयक सातत्याने मार्गदर्शन मिळत आहे, त्यामुळे शेती उत्पादनात वाढ झालेली आहे. विस्तारिकरणानंतरही स्थानिकांना नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये प्राधान्य मिळावे अशी विनंती केली.

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी आश्वासित केले की, विस्तारिकरण प्रकल्पात आवश्यक असणा-या रोजगारात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात

येईल. तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये स्थानिकांना प्राधान्य व प्रवेश देण्यात येईल.

**४) श्री संजय सुद्रिक पाटील, बारडगाव सुद्रीक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहिल्यानगर:-**

प्रकल्प प्रवर्तकांनी आजपर्यंत विकसित केलेल्या हरितपट्टा व त्यावर मिळालेल्या रोजगारामुळे पंचक्रोशीतील दहा गावांना लाभ झालेला आहे. तसेच विस्तारिकरणामुळे स्थानिक शेतक-यांची अतिरिक्त ऊस उत्पादन वाया न जाता त्याचे वेळेवर गाळप झाल्याने शेतक-यांची नुकसान टळेल व आर्थिक सशक्तीकरण होण्यास मदत होईल. तसेच विस्तारिकरणामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होईल.

त्यावर प्रकल्प प्रवर्तकांनी आश्वासित केले की, विस्तारिकरण प्रकल्पात आवश्यक असणा-या रोजगारात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल.

**५) श्री सुनंदा रेड्डी, राहणार-तेलंगणा:-**

त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारिकरणाबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सूचना केली की हरितपट्टा विकसित करताना औषधी वनस्पती व फळांच्या झाडांची लागवड करण्यात यावी. तसेच विस्तारिकरण

प्रकल्पास शासनाने विना विलंब मान्यता देण्यात यावी अशी विनंती केली.

६) **श्री प्रशांत गावडे, राहणार-बारडगाव सुद्रिक, तालुका-कर्जत, जिल्हा-अहिल्यानगर:-**

विस्तारिकरणामुळे प्रकल्पात किती अतिरिक्त मनुष्यबळाची गरज भासेल.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की विस्तारिकरणामुळे सुमारे १५०-२०० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकेल.

७) **आर व्यंकटेश, राज्य-तेलंगणा:-**

प्रकल्प प्रवर्तकांनी जरी ३३% पेक्षा जास्त हरितपट्टा विकसित केलेला असला तरीही त्यांनी औषधी वनस्पती व फळांची झाडे अधिकाधिक लागवड करण्यात यावी.

विस्तारिकरणामुळे अतिरिक्त वाहतुक व्यवस्थेसाठी स्थानिकांच्या वाहनांना प्राधान्य देण्यात यावे.

८) **श्री अकालय्या, राज्य-तेलंगणा:-**

सदरील विस्ताकरण प्रकल्पास लवकरात लवकर मान्यता देण्याची भारत सरकारला विनंती आहे.

**९) श्री राजेंद्र गुंड, राहणार-कुळधरण, तालुका-कर्जत, जिल्हा-अहिल्यानगर:-**

ऊस आणण्यासाठी ट्रॅक्टर वापरण्यात येतो. सदरहू ट्रॉलीचा अपघात होऊ नये यासाठी काय उपाययोजना करण्यात येतील?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की पूर्वीही आपण ट्रॅक्टर ट्रॉलीला रिफ्लेक्टर बसविलेले असून भविष्यात जेथे गरज असेल, तेथे रिफ्लेक्टर बसविण्यात येतील.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

जन सुनावणीचा समारोप करताना अध्यक्ष पर्यावरण समिती यांनी सांगितले की, उपस्थितांनी रस्ता दुरुस्ती व औषधी वनस्पती लागवड व फळझाडे लावण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच वेळोवेळी आरोग्य शिबिर परिसरात आयोजित करण्यात यावीत. तसेच स्थानिक युवक-युवतींना रोजगार सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण वेळोवेळी आयोजित करण्यात यावेत. उपस्थितांना सूचविल्याप्रमाणे स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजकांनी मा. अध्यक्ष यांच्या संमतीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले व मा. अध्यक्ष व उपस्थित नागरिकांचे आभार मानले.

एकुण ०५ निवेदने प्राप्त झाली.

**(चंद्रकांत शिंदे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
अहिल्यानगर

**(लिंबाजी भड)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

**(दादासाहेब गिते)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा
निवासी उप जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर